दि. ०६/०७/२०२१

# गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई-४००००१
## दरपत्रक सूचना

| अ.क्र. | निर्लेखन करावयाच्या वस्तुचे नांव | नग | अनामत रक्कम (रुपयात) | दरपत्रक धारकाने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | High Frequency Machine | १ | रु. २,५००/- | |
| ०२. | Ultrasound | १ | | |
| ०३. | SWD (२५० W) | १ | | |
| ०४. | SWD (२५० W) | १ | | |
| ०५. | SWD (५००W) | १ | | |
| ०६. | SWD (५०० W) | १ | | |
| ०७. | Cervical Traction | १ | | |
| ०८. | SWD (५०० W) | १ | | |
| ०९. | PWB | १ | | |
| १०. | IR Lamp | १ | | |
| ११. | Wooden Bed | १ | | |
| १२. | Plastic Chair | १ | | |
| १३. | Standing Tilt Table | १ | | |
| १४. | Static Bicycle | १ | | |
| १५. | Dr. Gengelos Apparatus | १ | | |
| १६. | Hitra Exs Table | १ | | |
| १७. | Wooden Chair | ३ | | |
| १८. | Screen Iron | १ | | |
| १९. | Examination Table | १ | | |
| २०. | Alluminium Degchi | १ | | |

१) अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील या रुग्णालयातील भौतिकोपचार व व्यवसायोपचार विभागातील जीर्ण झालेली यंत्रसामुंग्री जेथे आहेत व जसे आहेत त्या स्थितीत विक्रि करण्यासाठी मोहरबंद निविदा प्रशासकीय कार्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, तळ मजला, खरेदी विभाग, मुंबई - ४०० ००१ येथे स्विकारल्या जातील. निविदा/दरपत्रक फॉर्मची किंमत रु. २५०/- (ना-परतावा) आहे.

२) निविदा/दरपत्रक फार्म्स घेवून सिलबंद निविदा/दरपत्रके भरण्याची तारीख दिनांक ०७/०७/२०२१ ते दिनांक १३/०७/२०२१ पर्यंत दुपारी १२.०० पर्यंत आहे. त्यानंतर प्राप्त होणारे देकार विचारात घेतले जाणार नाहीत. सिलबंद लिफाफा दिनांक १५/०७/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता, प्रशासकीय कार्यालय, तळ मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई येथील वैद्यकीय अधिक्षक यांचे दालनात उघडण्यांत येतील किंवा त्याचा दिनांक व वेळ शासनाच्या सोयीनुसार ठरविण्यांत येईल.

३) सदर निविदा सादर करतांना दोन लिफाफा पध्दत अवलंबण्यांत यावी. एक लिफाफा हा टेक्निकल बीड

Scanned with CamScanner

व दुसरा लिफाफा कमर्शियल बीड म्हणून भरण्यांत यावा. दोन्ही लिफाफयावर तसे ठळक अक्षरात नमूद करण्यांत यावे.

४) पहिल्या लिफाफयामध्ये (टेक्निकल बीड) सादर करणाऱ्या ठेकेदाराने दिनांक ३१/०३/२०२० पर्यातच आयकर/जीएसटी भरणा केल्याची प्रत सादर करणे बंधनकारक राहिल. पॅन कार्डची प्रत तसेच अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफट) भरण्यात यावा.

५) दुसऱ्या कमर्शियल बीड लिफाफयामध्ये फक्त देकार सादर करण्यात यावा. देकार सादर करताना प्रत्येक बाबीची किंमत स्वतंत्र रित्या भरण्याची यावी. निविदा लिफाफयावर **"जुनी व जीर्ण अवस्थेतील यंत्रसामुग्रीची विक्रिकरण्याबाबतची निविदा/दरपत्रक"** असे लिहून मोहरबंद करण्यांत यावे.

६) टेक्निकल बीड व कमर्शियल बीड यांचे दोन्ही लिफाफे तिसऱ्या स्वतंत्र मोठया लिफाफयामध्ये भरुन "गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई यांचेकडील भौतिकोपचार व व्यवसायोपचार विभागातील जुनी व जीर्ण झालेली यंत्रसामुग्री निर्लेखनाबाबतची निविदा/दरपत्रक" असे ठळक अक्षरांत लिहून मोहोरबंद करण्यांत यावे.

७) निविदेसोबत रु. २५००/- (अक्षरी दोन हजार पाचशे फक्त) इतक्या अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बॅकेचा दर्शनी धनाकर्ष (डिमांड ड्राफट) " The Superintendent, Gokuldas Tejpal Hospital, Mumbai-१" या नावाने काढावा व निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. ज्या दरपत्रकासोबत अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डिमांन्ड ड्राफट) जोडलेला नसेल, त्या दरपत्रकाचा लिफाफा ग्राहय/विचारात घेता येणार नाही.

९) सक्षम अधिकारी उच्चतम किंमतीची किंवा अन्य कोणतीही निविदा स्विकार करण्यास वचनबध्द नाही. त्याचप्रमाणे कोणतीही सूचना न देता एखादी किवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१०) भाग घेतलेल्या देकारांमधून उच्चतम देकार असणाऱ्या देकाराची निवड करण्यात येईल. प्राप्त झालेली दरपत्रके उघडल्यानंतर वाजवी उच्चतम देकार प्राप्त न झाल्यास प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार अधिक्षकांना राहतील.

११) ग्राहय ठेकेदारास आदेश निर्गमित झाल्यापासून नमूद केलेली देकार रक्कम व अनामत रक्कम ३ दिवसांत भरणा करणे बंधनकारक राहील. त्यानंतर सदर यंत्रसामुग्रीची ७ दिवसांत उचल करावी लागेल. विलंब झाल्यास प्रति आठवडा एकूण किंमतीच्या १ टक्के दंड लागू होईल. याबाबत काही कारणास्तव ठेकेदारास दिलेल्या कालावधीत यंत्रसामुग्रीची उचल करण्यास विलंब झाल्यास त्याबाबत पुरवठादाराने सबळ कारण दिल्यास अधिक्षक यांना दंड शिथिल करण्याचा अधिकार राहील.

१२) भंगार अवस्थेतील यंत्रसामुग्रीची वाहतूक करणे व त्याची योग्य विल्हेवाट लावणे याकरिता लागणाऱ्या विविध विभागाच्या (उदा. वाहतूक पोलीस विभाग/पालिस विभाग, महानगर पालिका इ.) आवश्यक त्या परवानग्या घेण्याची जबाबदारी सर्वस्वी ठेका लागलेल्या ठेकेदाराची राहील. यासंबंधी असलेल्या सर्व नियमांचे पालन करणे ठेकेदारास बंधनकार राहील.

2/3/2

**अधिक्षक**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई

Scanned with CamScanner